# साजण वारे

तूजसाठी गहिवर झाला, तूजसाठी अंतर तुटले ।
पाचोळा नक्षी मार्गी, वाऱ्याचे चित्त बिथरले ॥ १ ॥

तिष्ठता अंग दिशांचे, हिरमोड उडाले पक्षी ।
गवता पात्यांना अन्, परिचय नवे उलगडले ॥ २ ॥

बहर कोष काजव्यांचे, मोकलून हुंदक्या रात्री ।
चांदण अल्लड गजरे, पायात तिच्या निखळले ॥३ ॥

अंतरी दाटल्या पंक्ती, पेरून मोह अनादी ।
सोडूनी बांध मनाचे, बिलगले नक्षत्र किनारे ॥ ४ ॥

ओघवत्या रजनी रंगे, प्रणयाचे मदील शहारे ।
माझ्या गुल्मल अंगी, घुमते साजण वारे ॥ ५ ॥

- सपु, सचिन पु. कुलकर्णी